मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

लवाद दावा क्रमांक ६९/२०२०

अहमदनगर मर्चन्टस सहकारी बँक लि.
अहमदनगर **---- वादी**

विरुध्द

१) एम/एस. उज्वल इलेक्ट्रीकल स्टँम्पिंग
प्रा.लि. आणि इतर. **---- प्रतिवादी**

लवाद दावा क्रमांक ७०/२०२०

अहमदनगर मर्चन्टस सहकारी बँक लि.
अहमदनगर **---- वादी**

विरुध्द

१) एम/एस. उज्वल इलेक्ट्रीकल स्टँम्पिंग
प्रा.लि. आणि इतर. **---- प्रतिवादी**

लवाद दावा क्रमांक ७१/२०२०

अहमदनगर मर्चन्टस सहकारी बँक लि.
अहमदनगर **---- वादी**

विरुध्द

१) एम/एस. उज्वल इलेक्ट्रीकल स्टँम्पिंग
प्रा.लि. आणि इतर. **---- प्रतिवादी**

एकत्रीत निशाणी-५ वरील आदेश

१) वादी बँकेने प्रतिवादीं विरुध्द वरील नमुद दावे दाखल केले असुन, वादी बँकेने प्रतिवादीं विरुध्द निशाणी-५ कडे अर्ज दाखल करुन प्रतिवादीच्या ताब्यात असलेली मालमत्ता दाव्याचा निकाल लागेपर्यंत जप्त करण्याची विनंती केली. वरील तीन्ही दाव्याचे नमुद मिळकत एकच असल्यामुळे आणि तीन्ही दाव्यातील प्रतिवादी एकच असल्यामुळे, तीन्ही दाव्यातील अर्ज एकाच स्वरुपाचे असल्याने एकत्रीतरित्या निकाली काढणे आवश्यक आहे.

२) वादी बँकेने सदरचे अर्ज दाखल केल्यानंतर या अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता तीन्ही दाव्यांमध्ये अर्ज केला आणि सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला. त्यानंतर वादी बँकेने सदरच्या अर्जामध्ये दुरुस्ती केली. वादी बँकेने दाखल केलेल्या अर्जामध्ये कथन केले की, बँकेने प्रतिवादी क्र.१ कंपनीला रु.१०,२५,००,०००/- कर्ज मंजुर केले त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ते ५ हे जामीनदार आहेत. सर्व प्रतिवादींनी नमुद करारपत्रातील शर्ती आणि अटी नुसार कर्ज परतफेउ करण्याची जबाबदारी स्विकारली परंतु त्यांनी कर्जाची परतफेड केली नाही.

३) प्रतिवादी क्र. २ ते ५ हे त्यांच्या ताब्यात असेलेल्या मिळकतीची विल्हेवाट लावण्याच्या तयारीत आहेत आणि प्रतिवादी त्यामध्ये यशस्वी झाल्यास वादी बँकेचे नुकसान होईल. प्रतिवादी हे कर्जाची जबाबदारी टाळण्याकरिता त्यांच्याकडे

असलेल्या मिळकतीची विल्हेवाट करु इच्छित आहेत अशी खात्रीलायक माहिती बँकेला मिळाली आहे आणि त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या ताब्यात असलेली खालील नमुद मालमत्ता दाव्याचा निकाल लागेपर्यंत जप्त करण्यात यावी.

Shedule-I

(Description of Land and Building of Defendant No.1 Company)

A) Leasehold rights of the borrower company in all that the piece of parcel of land together with hereditaments and premises and building now standing thereon and situate lying and being at plot No.L-31 admeasuring 1000 Sqr. Mtrs. together with construction thereon situated at M.I.D.C., Nagapur, Ahmednagar. There is construction of Factory Building in the said plot and total built up area of construction is admeasuring 287.04 Sqr. Mtrs. Its boundaries are as follows:

Towards East	-	Plot No. L-30
Towards South	-	Plot No. L-52 and L-53
Towards West	-	Plot No. L-32
Towards North	-	Road

Schedule-II

(Property owned by Defendant No.2 namely Mr.Anil Ratho Sali)

B) All part and parcel of the property bearing Flat No.006 situated on the Ground Floor of the building No. P. In "Rohan Mithila- C" Project having Carpet area of admeasuring 63.10 Sqr. Mtrs. i.e. 679.00 Sqr. Ft. which is corresponding to Built-up area about 70.49 Sqr. Mtrs. i.e. 759.00 Sqr. Ft. which includes area of Balconies along with area admeasuring 14.70 Sqr. Mtrs. being proportionate share in common areas which as Staircase, Landings, Corridors, Passages, Lift, Entrance Lobbies etc. area admeasuring 42.18 Sqr. Mtrs. i.e. 453.86 Sqr. Ft. being area of adjacent terrace/s adjacent

to the said accommodation as right to use and right to use one Car Parking Space in Basement admeasuring area about 11.15 Sqr. Mtrs. The said building is constructed over the property being Plot No. C admeasuring area about 12317.78 Sqr. Mtrs. our of Survey No.229 admeasuring area about 2 Hector 98 Ares and area admeasuring 5 Hector 78 Areas being Survey No.229/1 to 229/15, total admeasuring 8 Hector 18 Ares situated at village Lohgaon, corresponding part of City Survey No.211, City Survey Lohgaon, within the registration district Pune Sub Registration District Haveli. Taluka Haveli and within the limits of Pune Municipal Corporation, Pune. The boundaries of the same are as follows:

Towards East	-	By Plot No. B out of the part of Survey No.299 and Survey No.299/1 to 229/15
Towards South	-	By part of Survey No.230
Towards West	-	By Plot No. D and Open Space out of Survey No.229 & Survey No.229/1 to 229/15
Towards North	-	By 12 Meter wide Internal Road

C) All part and parcel of the property bearing Flat No. 506 situated on the Fifth Floor of the building No. G. In 'Rohan Mithila - C' Projected having Carpet area of admeasuring 86.13 Sqr. Mtrs. i.e. 927.00 Sqr. Ft. which is corresponding to Built-up area about 96.86 Sqr. Mtrs. i.e. 1043.00 Sqr. Ft. which includes area of Balconies along with area with areas admeasuring 19.37 Sqr. Mtrs. being proportionate share in common areas which as Staircase, Landings, Corridors, Passages, Lift, Entrance Lobbies etc. area admeasuring 37.81 Sqr. Mtrs. i.e. 407.00 Sqr. Ft. being area of adjacent terrace/s adjacent to the said accommodation as right to use and right to use One Car Parking Space in Basement admeasuring area about 9.29 Sqr. Mtrs. The said building is constructed over the property being Plot No. C admeasuring area about 12317.78 Sqr. Mtrs. Out of Survey No. 229

admeasuring area about 2 Hector 98 Area and area admeasuring 5 Hector 78 Ares being Survey No.229/1 to 229/15, total admeasuring 8 Hector 18 Ares situated at village Lohgaon, corresponding part of City Survey No. 211, City Survey Lohagaon, within the registration district pune Sub Registration District Haveli, Taluka Haveli and within the limits of Pune Municipal Corporation, Pune. The boundaries of the same are as follows :

Towards East	-	By Plot No. B out of the part of Survey No.229 and Survey No. 229/1 to 229/15
Towards South	-	By part of Survey No. 230
Towards West	-	By plot No. D and Open Space out of Survey No.229 & Survey No. 229/1 to 229/15
Towards North	-	By 12 Meter wide Internal Road.

D) All part and parcel of the property bearing Plot No.21B admeasuring Plot area of 152.25 Sqr. Mtrs. out of CTS No.6906 situated at Bank of Baroda Colony, Balikasharm Road, Savedi, Ahmednagar together with construction of Bungalow (Ujwanil Bunglow) having toatal Built-up area of 103.03 Sqr. Mtrs. within registration office of Sub Registrar, Ahmednagar.

E) All the piece and parcel of property i.e. agricultural land bearing Gat No.169 admeasuring 4 H & 82 R + Potkharaba 0 H & 07 R admeasuring total area of 4 H & 89 R situated at village Vadgaon Kurum (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub-Registrar, Murtijapur.

Towards East	-	Gat No. 58 our of Mauje Dangarkhede
Towards West	-	Shiv Road
Towards North	-	Gat No. 169 of Vadgaon Kurum
Towards South	-	Gat No.171 of Vadgaon Kurum

F) All the piece and parcel of property i.e. agricultural land bearing Gat No.170 admeasuring 4 H & 05 R situated at Village Vadgaon Kurum, (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub-Registrar, Murtijapur.

Towards East	-	Gat No. 58 out of Mauje Dangarkheda
Towards West	-	Gat No. 169 of Vadgaon Kurum
Towards North	-	Gat No. 171 of Vadgaon Kurum
Towards Sourth	-	Shiv Road

G) All the piece and parcel of property i.e. East-West Agricultural Land from Northrn Portion of Gat No.165 admeasuring 1 H & 54 R out of total area admeasuring 5 H & 18 R situated at village Vadgaon Kurum (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola. within registration office of Sub Registrar, Murtijapur.

Towards East	-	Shiv Rasta
Towards West	-	Gat No. 163 & 164 of Vadgaon Kurum
Towards North	-	Gat No. 166 of Vadgaon Kurum
Towards Sourth	-	Remaining land out of Gat No.165

H) All the piece and parcel of property i.e. North-South Agricultural Land from Middle Portion of Gat No.152/2 admeasuring 1 H & 41 R + Potkharaba 0 H & 3 R out of total area admeasuring 3 H & 44 + Potkharaba 0 H & 44 R situated at village Pimpalvihir, Tal. & District Amaravati, within registration office of Sub Registrar, Amaravati Rural.

Towards East	-	Farm of Mr.Pradip Sahebrao Thakare
Towards West	-	Farm of Mrs. Sangita Khandelwal
Towards North	-	Amaravati-Nagpur Road
Towards South	-	Government Road and Forest Land

I) All the piece and parcel of property i.e. Agricultural Land bearing Gat No.40 admeasuring 1 H & 67 R situated at village Dhangarkheda, Tal. Karanja & District Washim, within registration office of Sub Registrar, Karanja.

J) All the piece and parcel of property i.e. Agricultural Land bearing Gat No.58 admeasuring 3 H & 45 R out of total area admeasuring 4 H & 47 R + Potkharaba 0 H & 70 R situated at village Dhangarkheda, Tal. Karanja & District Washim, within registration office of Sub Registrar, Karanja.

<u>Sechedule-III</u>

(Prpoerty owned by Defendant No. 3 namely Mrs. Ujwala Anil Sali)

K) All the piece and parcel of property i.e. Agricultural Land bearing Gat No.171 admeasuring 3 H & 67 R situated at village Vadgaon Kurum, (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub Registrar, Murtijapur.

Towards East	-	Gat No. 40 out of Mauje Dangarkheda
Towards West	-	Shiv Rasta
Towards North	-	Gat No.170 of Vadgaon Kurum
Towards South	-	Gat No.172 of Vadgaon Kurum

L) All the piece and parcel of property i.e. Agricultural Land bearing Gat No.180 admeasuring 1 H & 63 R situated at village Vadgaon Kurum, (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub Registrar, Murtijapur.

Towards East	-	Shiv Rasta
Towards West	-	Gat No. 153 out of Vadgaon Kurum
Towards North	-	Gat No.154 of Vadgaon Kurum
Towards South	-	Gat No.181 of Vadgaon Kurum

M) All the piece and parcel of property i.e. Eest - West Agricultural Land from Southern Portion of Gat No.165 admeasuring 3 H & 64 R out of total area admeasuring 5 H & 18 R situated at village Vadgaon Kurum, (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub Registrar, Murtijapur.

Towards East	-	Shiv Rasta
Towards West	-	Gat No. 163 & 164 of Vadgaon Kurum
Towards North	-	Remaining land out of Gat No.165
Towards South	-	Gat No.154 of Vadgaon Kurum

N) All the piece and parcel of property i.e. Agricultural Land bearing Gat No.163 admeasuring 2 H & 61 R situated at village Vadgaon Kurum, (As per Sale Deed village Vadgaon), Tal. Murtijapur & District Akola, within registration office of Sub Registrar, Murtijapur.

Towards East	-	Gat No. 165 of Vadgaon Kurum
Towards West	-	Gat No. 155 of Vadgaon Kurum
Towards North	-	Gat No.162 of Vadgaon Kurum
Towards South	-	Gat No.164 of Vadgaon Kurum

Schedule-IV

(Property owned by Defendant No.4 Namely Pratap Bharatsingh Pardeshi)

O) All the piece and parcel of the building and appurtenances thereof styled as 'Kaushalya Park Apartment' from and out of Final Plot No.181/6, TP Scheme No. 4 area admeasuring 376.24 Sqr. Mtrs. situated at Savedi within limits of Municipal Corporation, Ahmednagar out of which the premises

bearing Apartment No. 7 i.e. Flat No. 101 having Carpet area 76.87 Sqr. Mtrs. (827.13 Sqr. Ft.) whose Built-up area 96.09 Sqr. Mtrs. (1033.93 Sqr. Ft.) situated at First Floor in said Apartment bounded as follows:

Towards East	-	Marginal Space of Scheme
Towards West	-	Marginal Space of Scheme
Towards North	-	Marginal Space of Scheme
Towards South	-	Staircase and Flat No. 102

४) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा क्र.६९/२०२० मध्ये निशाणी-४० कडे, दावा क्र.७०/२०२० मध्ये निशाणी-४० कडे आणि दावा क्र.७१/२०२० मध्ये निशाणी-४० कडे त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले. तसेच प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दावा क्र.६९/२०२० मध्ये निशाणी-४७ कडे, दावा क्र. ७०/२०२० मध्ये निशाणी-४३ कडे आणि दावा क्र. ७१/२०२० मध्ये निशाणी-४७ कडे म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचे या अर्जाच्या अनुषंगाने तीन्ही दाव्यात एकाच स्वरुपाचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कथन केले की, त्यांच्या विरुध्द दाखल केलेला दावा बेकायदेशीर आहे. वादीने यापूर्वी प्रतिवादी क्र.१ कंपनीची स्थावर, जंगम मिळकत योग्य ती कारवाई करुन ताब्यात घेतली आहे त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व ३ विरुध्द केलेली कारवाई अयोग्य आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार नाहीत. त्यांना कोणत्याही कर्जाचा फायदा झाला नाही आणि प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार आहेत असे मानले तरी कराराच्या

कायद्यानुसार प्रतिवादी क्र.२ व ३ यांची जबाबदारी संपुष्टात आली आहे. वादी बँकेने प्रतिवादी क्र.१ कंपनी विरुध्द कोणतीही कर्ज वसुलीची कारवाई केली नाही.

५) वादीने दि.१७ सप्टेंबर, २०१८ रोजी प्रतिवादी क्र.१ कंपनीचा पावर सप्लाय कट करुन प्रतिवादी क्र.१ कंपनीच्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे आणि ताबा घेतल्यानंतर प्रतिवादी क्र.१ कंपनीमध्ये चोरी झाली असुन तो मुद्दा वादग्रस्त आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अव्वल जप्तीस पात्रता असणारे कोणतेही कृत्य केले नाही, त्यामुळे वादी बँकेला मिळकत ताब्यात घेऊन जप्ती मागण्याचा अधिकार नाही.

६) प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी वादीने केलेल्या अर्जातील कथन नाकारले आहे आणि निवेदन केले आहे की, वादी बँकेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्याशी प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी संगनमत करुन चूकीचे व बोगस कर्जप्रकरण केले आहे. वादीने त्यांच्या अर्जात परिशिष्ट-२ 'ओ' मध्ये नमुद असलेली घरमिळकत ही प्रतिवादी क्र.४ यांच्या पूर्व मालकीची होती व सदर मिळकत प्रतिवादी क्र.४ यांनी आर्थिक अडचणीमूळे व कर्जफेड करण्यासाठी दि.१७/०९/२०१९ रोजी रजिस्टर खरेदीखताद्वारे विक्री केलेली आहे आणि मिळकत खरेदी घेणाऱ्याचे नाव रेव्हेन्यू रेकॉर्डला लागलेले आहे. त्यामुळे सदर मिळकत आज प्रतिवादी क्र.४ यांच्या मालकीची नाही.

७) प्रतिवादी क्र.४ व ५ हे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कंपनीतील कर्मचारी होते. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी अनेक प्रकारची कर्ज काढून ती थकवली म्हणून कंपन्या बँकांनी सिल केलेल्या आहेत. या प्रतिवादींनी कामाचा राजीनामा दिलेला आहे. ते कधीही कर्जासाठी जामीनदार नव्हते. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी या प्रतिवादीच्या खोटया व बोगस सह्या केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.१ कंपनी करिता सीडबीआयडीबीआय कडून मोठया रक्कमेचे कर्ज घेतले होते. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन कर्ज घेतले आहे. वादी बँकेच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आणि दाव्याचा समतोल नाही. त्यामुळे वादीचे अर्ज नामंजूर करण्यात यावे.

वादी आणि प्रतिवादींच्या कथनावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात आणि माझा निष्कर्ष कारणमिमांसासह खालील प्रमाणे.

	मुद्दे		**निष्कर्ष**
१)	अर्जातील नमुद मिळकती जप्त करण्याचा वादीला अधिकार आहे काय?	----	अंशतः होकारार्थी
२)	आदेश काय?	----	ंअंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

८) वादीने वर नमुद तीन्ही दाव्यात दाखल एकाच स्वरुपाचे अर्ज दाखल करुन मागणी केली आहे की, प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या ताब्यात असलेली अर्जातील नमुद मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत जप्ती करण्यात यावी. वादीने या अनुषंगाने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ ते ५ हे वादीचे कर्ज टाळण्याकरिता त्यांच्या ताब्यात असलेली मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहेत आणि प्रतिवादीने असे

केल्यास बँकेचे नुकसान होईल. याउलट प्रतिवादींनी त्यांच्या लेखी उत्तरात वादीचे सर्व कथन नाकारले. मुद्दा उपस्थित होतो की, वादी बँक अर्जात केलेली मागणी करिता हक्कदार आहे किंवा नाही. वादी बँकेने तीन्ही दाव्यांमध्ये रक्कम रु.१०,२५,००,०००/- प्रतिवादी क्र.१ कंपनीला प्रतिवादी क्र.२ व ३ मार्फत मंजुर केल्याचे नमुद केले आणि त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ते ५ जामीनदार असल्याचे सुध्दा कथन केले आणि प्रतिवादीकडे दावा क्र.६९/२०२० मध्ये रु.२५,१२,९९४.२०/-, दावा क्र.७०/२०२० मध्ये रु.११,५४,५७,०१९.४०/- आणि दावा क्र.७१/२०२० मध्ये रु.१,८८,१८,०४४.१३/- रक्कम बाकी आहे.

९) वादीने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ९५ मधील तरतुदीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. या कलमातील तरतुदीनुसार वादीला निकालापूर्वी प्रतिवादीची मिळकत जप्त करुन मागण्याचा अधिकार प्राप्त होतो. जर न्यायालयाच्या निदर्शनास आले असेल की, प्रतिवादी निकालाची अंमलबजावणी विफल करण्याच्या, विलंब ल ावण्याच्या किंवा अडथळे आणण्याच्या दृष्टीने मालमत्तेची विल्हेवाट लावण्याच्या बेतात आहे, तर न्यायालय मिळकत जप्तीचा आदेश देऊ शकते. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी त्यांच्या ताब्यात असलेल्या मिळकतीची विल्हेवाट लावू इच्छित आहे काय, हे पाहणे आवश्यक आहे.

१०) वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादी बँकेने त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या ताब्यात असलेली मिळकतीचे वर्णन परिशिष्ट-१ (ए) आणि परिशिष्ट-२ (बी) ते (जे) आणि परिशिष्ट-३ (के) ते (एन) आणि परिशिष्ट-४ मध्ये (ओ) केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ अर्जाच्या उत्तरामध्ये नमुद केले आहे की, वादी बँकेने सप्टेंबर, २०१८ मध्ये प्रतिवादी क्र.१ कंपनीच्या मालमत्तेचा ताबा घेतला. परंतु त्यासंबंधी प्रतिवादींनी कागदपत्रे दाखल केली नाहीत. तसेच प्रतिवादींच्या वकीलांनी त्यांच्या युक्तिवादासमर्थ की, अर्जातील नमुद मिळकतीवर इतर बँकेचा बोजा चढविला आहे. परंतु यासंबंधी कागदपत्रे दाखल केली नाहीत. प्रतिवादी क्र.२ ते ५ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार आहेत किंवा नाहीत ही बाब याक्षणी ठरविणे उचित होणार नाही. त्याकरिता दोन्ही पक्षकारांचा पुरावा रेकॉर्डवर असणे गरजेचे आहे. याक्षणी महत्वाची बाब प्रतिवादी हे त्यांच्या ताब्यात असलेली अर्जातील नमुद मिळकत हस्तांतरीत किंवा विक्री करण्याच्या तयारीत आहे किंवा नाही. वादीने या अर्जाच्या समर्थ शपथपत्र दाखल करुन नमुद केले की, प्रतिवादी वादी बँकेचे कर्ज टाळण्याकरिता त्यांच्या ताब्यात असलेली मिळकत हस्तांतरीत करु इच्छित असल्याची खात्रीलायक माहिती बँकेला मिळाली आहे. प्रतिवादीने त्यांच्या कथनाच्या समर्थ कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. त्यामुळे वादीने शपथवेवर केलेल्या निवेदनावर विश्वास का ठेवण्यात येऊ नये. कारण तीन्ही दाव्यातील कर्ज वसुली मागणीचा विचार करता प्रतिवादीकडे रु.१३.०० करोडपेक्षा रक्कम बाकी असल्याचे दिसुन येत आहे आणि प्रतिवादीच्या ताब्यात असलेली मिळकत त्यांनी दावा प्रलंबित असतांना, बँकेच्या संमतीशिवाय हस्तांतर किंवा विक्री केल्यास बँकेचे फार

मोठे नुकसान होईल हे नाकारता येत नाही आणि वादी बँकेला त्यानंतर प्रतिवादीकडून तीन्ही दाव्यातील रक्कम वसुल करण्याचा पर्याय बाकी राहाणार नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे म्हणणे आहे की, त्यांनी मिळकत जप्ती पात्रतेकरिता कोणतेही कृत्य केले नाही. तसेच वादीने जप्ती करणे करिता कायदेशीर कारण नमुद केले नाही. वादीच्या कथनावरुन दिसुन येते की, प्रतिवादी हे त्यांची मिळकतीची विल्हेवाट लावण्याच्या बेतात आहे अशी खत्रीशीर माहिती मिळाली, त्यामुळे वयादीच्या या कथनावर विश्वास का ठेऊ नये. प्रतिवादी हे त्यांची मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत विल्हेवाट लावणार नाही यासंबंधी लेखी उत्तराद्वारे मान्य केले नाही. वादीच्या वरील नमुद दाव्यातील कथनावरुन दिसुन येते की, प्रतिवादीकडून वादीला बरीच रक्कम येणे बाकी आहे आणि प्रतिवादीची मिळकत केवळ ही प्रतिवादीकडे बाकी असलेल्या रक्कमा वसुल करणे करिता पुरेशी आहे. त्याशिवाय वादीकडे रक्कम वसुली करिता दुसरा पर्याय असल्याचे दिसुन येत नाही.

११) तीन्ही दाव्यातील कर्जाचे अवलोकन केले असता दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या मालकीची मालमत्ता वादी बँकेच्या हक्कात तारण गहाणखत करुन दिले आहे. वादी बँकेने अर्जात्ील मागणी संदर्भात जरी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही परंतु बँकेने शपथेवर केलेले विधान नाकारता येत नाही. तसेच तीन्ही दाव्यातील कर्ज रक्कमेचा विचार करता वादी बँक या अर्जातील नमुद मिळकती जप्त करण्यास हक्कदार आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांच्या ताब्यात असलेली मिळकत जी की,

वादी बँकेने अर्जातील परिशिष्ट-४ मध्ये नमुद केलेली मिळकत, प्रतिवादी क्र.४ यांनी सन २०१९ मध्ये विक्री केलेली आहे आणि दाखल कागदपत्रे दर्शवितात की, सदरची मिळकत प्रतिवादी क्र.४ यांनी दि.१६/०९/२०१९ रोजी रजिस्टर तारण गहाणखताद्वारे किरण बाबुसिंग महेर यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे वादी बँकेचा या मालमत्तेवर कोणताही हक्क प्राप्त होत नाही आणि वादी बँकेने या मिळकतीसंबंधी जप्ती करण्याची केलेली मागणी अयोग्य आहे आणि मंजुर करता येत नाही. वादी बँकेचा वरील दाव्यातील तीन्ही अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

वरील कारणास्तव वादीचे वरील दाव्यातील तीन्ही अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे आणि त्यानुसार खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

आ दे श

१) वादीचा दावा क्र.६९/२०२०, दावा क्र.७०/२०२० आणि दावा क्र.७१/२०२० मधील अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची अर्जातील परिशिष्ट-१ ते ३ (ए) ते (एन) मधील नमुद मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत जप्त करण्यात येत आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : ०५/०९/२०२२

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.